जळगाव दि.३० (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात कवयित्री बहिणाबाई चौधरी अभ्यासिकेचे उदघाटन, ई कंटेंट सह व्हीडीओ कॉन्फरन्स सभागृहाचे उदघाटन तसेच समाज माध्यमांव्दारा विद्यापीठाशी संपर्कात राहणेकरीता केबीसीएनएमयु डिजीटल कनेक्टचा प्रारंभ आज कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी व सर्व व्यवस्थापन परिषद सदस्य यांच्या उपस्थित आज दि.३० मे रोजी करण्यात आले.

विद्यापीठाच्या विचारधारा प्रशाळे अंतर्गत ज्ञानस्त्रोत केंद्रात कवयित्री बहिणाई चौधरी अध्ययन केंद्र पुरस्कृत कवयित्री बहिणाबाई चौधरी अभ्यासिकेचे उदघाटन कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे, कुलसचिव डॉ.विनोद पाटील यांच्यासह व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, प्राचार्य संजय सुराणा, प्राचार्य महेंद्र रघुवंशी, प्रा. शिवाजी पाटील, प्रा. पवित्रा पाटील, प्रा.सुरेखा पालवे, प्रा. म.सु. पगारे, नितीन झाल्टे, ॲड अमोल पाटील, प्रभारी अधिष्ठाता प्राचार्य एस.एस.राजपूत, प्राचार्य जगदिश पाटील, अधिसभा सदस्य केदारनाथ कवडीवाले, भानुदास येवलेकर, प्रभारी संचालक ज्ञानस्त्रोत केंद्र विजय आहेर उपस्थित होते.

या अभ्यासिकेत २५० विद्यार्थ्यांना बसण्यासाठी आरामदायी खुर्च्या, टेबल्स, लाईटस, पंखे, वायफाय सुविधा विविध वृत्तपत्रे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. ही अभ्यासिका विद्यापीठातील प्रशाळांतील विद्यार्थ्यांकरीता सकाळी ६ ते रात्री १२ या वेळेत सुटीच्या दिवसांसह नियमित दररोज सुरु असणार आहे.

**केबीसीएनएमयु डिजीटल कनेक्टचा प्रारंभ** : आजच्या डिजीटल युगात समाज माध्यमांचा वापर मोठया प्रमाणात वाढला आहे. त्याची उपयोगिता लक्षात घेता विद्यापीठाने केबीसीएनएमयु डिजीटल कनेक्टचा प्रारंभ आज दि. ३० मे रोजी कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांच्या हस्ते व्यवस्थापन परिषद सभा सुरु होण्यापूर्वी करण्यात आला.

विद्यापीठाने समाज माध्यमांव्दारा विद्यापीठाशी संबंधित विविध घटकासोबत संपर्कात राहण्यासाठी व विद्यापीठाच्या महत्वपूर्ण माहितीचा प्रसार सर्व व्यापी होण्याकरीता सोशल मिडीया प्लॅटफॉर्म सुरु करण्याकरीता संगणकशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा.राकेश रामटेके यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली होती. या समितीने आदर्श नियमावली तयार केली असून त्यानुसार विद्यापीठातील विविध प्रशाळा व प्रशासकीय विभागांनी आपआपली माहिती मान्यता घेऊन सोशल मिडीया टीम ला पाठवावयाची आहे. त्या अनुषंगाने विद्यापीठाची महत्वाची माहिती सुरुवातीस युव्ट्युब, व्हॉटस ॲप, लिंकड्इन या तीन समाज माध्यमांवर प्रसारित केली जाणार आहे. विद्यापीठाने याचे परिपत्रक प्रसिध्द केले असून या तीन समाजमाध्यमांव्दारे कनेक्ट करण्याकरीता क्युआर कोड देण्यात आले आहेत. ते स्कॅन केल्यानंतर कनेक्ट होता येणार आहे. विद्यापीठाशी संबंधित विविध घटकांनी या सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

**ई कंटेटसह सज्ज व्हीडीओ कॉन्फरन्स सभागृहाचे उदघाटन** : विद्यापीठातील प्रशासकीय इमारतीमध्ये वेळोवेळी ऑनलाईन सभा मा.कुलपती, राज्य शासनाचे विविध विभाग व इतर समिती यांच्यासोबत होत असतात. ही गरज लक्षात घेऊन विविध इलेकट्रॉनिक्स साधनांसह सज्ज व्हीडीओ कॉन्फरन्स कक्ष उभारण्यात आला. या कक्षाचे उदघाटन आज ३० मे रोजी करण्यात आले. यावेळी कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांच्यासह सर्व व्यवस्थापन परिषद सदस्य व प्रभारी कार्यकारी अभियंता एस.आर. पाटील उपस्थित होते.

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
जनसंपर्क विभाग

# बातमी क्र.२

जळगाव दि.३० (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सभा कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली आज दि. ३० मे रोजी आयोजीत करण्यात आली. या सभेत विद्यापीठात वाणिज्य प्रशाळेसह नविन अभ्यासक्रम सुरु करणे, जागतिक स्पर्धेत सहभागी खेळाडू विद्यार्थ्यांना भरीव मदत, मैदानी स्पर्धांसाठी प्रशिक्षण शिबीर तसेच विविध अभ्यासक्रमांना मान्यता आदी विषयांवर चर्चा होऊन खेळीमेळीच्या वातावरणात सभा संपन्न झाली.

यासभेत प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे, कुलसचिव डॉ.विनोद पाटील यांच्यासह व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, प्राचार्य संजय सुराणा, प्राचार्य महेंद्र रघुवंशी, प्रा. शिवाजी पाटील, प्रा. पवित्रा पाटील, प्रा.सुरेखा पालवे, प्रा. म.सु. पगारे, नितीन झाल्टे, ॲड अमोल पाटील, प्रभारी अधिष्ठाता प्राचार्य एस.एस.राजपूत, प्राचार्य जगदिश पाटील, वित्त व लेखा अधिकारी सीए रवींद्र पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा.योगेश पाटील हे प्रत्यक्ष तर डॉ.संदीप पाटील ऑनलाईन उपस्थित होते.

यासभेत विद्या परिषदेने शिफारस केल्या नुसार विद्यापीठात वाणिज्य प्रशाळा सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला. या प्रशाळेत बी.कॉम रिटेल मॅनेजमेंट हा पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास देखील मान्यता देण्यात आली. तसेच बी.ए. /बीएस्सी.लिबरल आर्ट, बीएस्सी. अप्लाईड बायोलॉजी, कला व मानव्यशास्त्र प्रशाळेअंतर्गत बी.ए. ह्युमॅनिटीज व सिव्हील सर्व्हिसेस हा पदवी अभ्यासक्रम तसेच विद्यापीठाच्या नंदुरबार येथील आदिवासी अकादमी येथे एम.ए. ट्रायबल स्टडीज हा दोन वर्षीय पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम, एम.एस्सी. डेटा सायन्स या अभ्यासक्रमासही सुरु करण्यास मान्यता देण्यात आली.

विद्यापीठाचे खेळाडू आरती पावरा व रिंकी पावरा ह्या जागतिक मैदानी स्पर्धेत सहभागी होत आहेत. त्यांना प्रत्येकी २ लाख ५० हजार असे एकूण ५ लाखाची मदत त्यांना या स्पर्धेसाठी होणाऱ्या खर्चासाठी देणेबाबत आजच्या सभेत मान्यता देण्यात आली. तसेच विद्यापीठात ३ ते १२ जून या कालावधीत आयोजित मैदानी स्पर्धांच्या प्रशिक्षण शिबीरात सहभागी होणाऱ्या १००विद्यार्थी व विद्यार्थ्यांनींना विद्यापीठाकडून जाणे – येणे चा प्रवास खर्च व निवासासह नाश्ता व जेवणाचा खर्चास आजच्या सभेत मान्यता देण्यात आली.

..................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: ३० मे, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता